कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड. सिद्धार्थ
MVsc, MBA, LLM
मो नं ९४२२५३९४५१

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. २३ जून 2026



१९३८- डिलाईट रोड, मुंबई येथे दलित महिला मंडळाची स्थापना.
१९५६- दिल्ली येथे बौद्ध धम्मावर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
संकलन प्रा. यशवंत दुपटे

मंगळवार २३ जून २०२६ | वर्ष : ६ | अंक : १७३ | दैनिक | किंमत : ₹५/-
Tuesday, 23 June 2026 | Year : 6 | Issue : 173 | Daily | Rate: Rs. 5/-

# विधिमंडळ कामकाज गांभीर्याने घ्या, नाहीतर...



**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आजपासून मुंबईत सुरु झाले. राज्यभरातील प्रश्न, समस्यांचा उहापोह होऊन सरकारकडून जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी विरोधकांसाठी तर सरकारची भूमिका लोकांपर्यंत पोहचविण्यासाठीहक्काचे व्यासपीठ म्हणून विधिमंडळातील कामकाजाकडे पाहिले जाते. त्यामुळेच विधिमंडळाच्या कामकाजादरम्यान विरोधकांपेक्षा सत्ताधाऱ्यांची जबाबदारी अधिक असेत. मात्र अलिकडच्या काळात विधिमंडळाच्या कामकाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याची, विधिमंडळातील कामकाजाला सरकार गांभीर्याने घेत नसल्याची ओरड विरोधकांकडून केली जात आहे. त्यामुळे सरकार आणि विधिमंडळाच्या कामकाजाबाबत जनतेमध्येही नाराजी पसरू लागली आहे.

विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान मंत्री अनुपस्थित राहिल्यामुळे विधानसभा किंवा विधानपरिषदेचे कामकाज तहकूब करावे लागण्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अनेकवेळा सभागृहात आपल्या खात्याशी सबंधित विषयावर चर्चा सुरु असतानाही मंत्री मात्र आपल्या दालनात बसून बैठका घेत असतात. मंत्र्यांच्या बेफिकीर कारभारामुळे अनेकवेळा कामकाज तहकूब करण्याची आफत पिठासन अधिकाऱ्यांवर ओढवते. काही काही वेळा तर मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे नारा झालेल्या विरोधकांची समजूत काढण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा संसदीय कार्य मंत्र्यांना दिलगिरी व्यक्त करावी लागते. विधिमंडळाच्या कामकाजाकडे मंत्र्यांचे होणारे दुर्लक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी नवी डोकेदुखी ठरु लागली आहे. फडणवीस यांनी यापूर्वी अनेकवेळा विधिमंडळ अधिवेशनाला गांभीर्याने घ्या, सभागृहात उपस्थित राहून कामकाज सहभागी व्हा अशा सूचना वारंवार सहकारी मंत्र्याना दिल्या आहेत. मात्र तरीही मंत्र्यांच्या वर्तनुकीमध्ये फरक पडलेला नाही.

सभागृहातील कामकाजाकडे मंत्र्यांचे होणारे दुर्लक्ष आणि त्यामुळे सरकाची होणारी नामुष्की टाळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता नामी शक्कल काढली आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा विधिमंडळातील कामकाजावरुन मंत्र्यांना मार्गदर्शन केले. अधिवेशनकाळात सर्व मंत्र्यांनी विधिमंडळात उपस्थित रहावे. दोन्ही सभागृहातील कामकाज दरम्यान कोणत्या मंत्र्यांने कोणत्या सभागृहात उपस्थित रहावे याची माहिती दिली जाईल. त्यानुसार सर्व मंत्र्यांनी आपली जबाबदारी पार पाडावी. सभागृहातील मंत्र्यांनी अनुपस्थिती अजिबात खपवून घेतली जाणार नाही.

## कुणी फुली मारली, तर कुणी मतपत्रिकाच कोरी ठेवली

**नागपूर :** विधान परिषदेच्या स्थानिक मतदार संघाच्या १७ जागेसाठी निवडणुकीची प्रक्रिया पार पडली. काही ठिकाणी उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने निवडणूक बिनविरोध झाली. तर काही ठिकाणी मतदानाची प्रक्रिया पार पडली. आज मतमोजणी झाली. १७ पैकी १६ जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा विजय झाला. तर एका ठिकाणी अपक्ष उमेदवार विजयी झाले. या निवडणुकीत महाविकास आघाडीची मते फुटल्याचे चित्र आहे. त्यामुळे त्यांना मोठा फटका बसला. तर दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून पैसे आणि दबाव तंत्राचा वापर करण्यात आल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. या निवडणुकीत अनेकांची मते अवैध ठरली. मते अवैध ठरण्याची कारणेही मोठी रंजक आहे. या निवडणुकीत मतपत्रिकेवर मतदान झाले. निवडणुकीत पसंतीक्रम देता येत असल्याने सर्वच उमेदवारांना मतदान देण्याची तरतूद आहे. नागपूरसह बहुतांश ठिकाणी दोनच उमेदवार रिंगणात होते. एका ठिकाणी तीन उमेदवार रिंगणात होते. प्रत्येक मतदाराला मतदान करण्यासाठी विशिष्ट शाईचा पेन देण्यात आला होता. याच पेनाने मतदान करायचे होते. मतदान करण्यासाठी उमेदवाराच्या समोर १,२,३ असे क्रमांक लिहायचा होता. परंतु क्रमांक १ लिहिणे आवश्यक होते. १ लिहिल्यावरच मत ग्राह्य धरण्यात येणार होते.

# लखनौच्या कोचिंग सेंटरमध्ये भीषण आग ...



## १४ जणांचा होरपळून मृत्यू

**लखनौ :** राजधानी लखनौमधील अलिगंज जिल्ह्यातील पुरानिया येथील एका कोचिंग सेंटरला आज, २२ जून रोजी भीषण आग लागली. कोचिंग सेंटरला भीषण आग लागली आणि इमारत धुराने भरून गेली. यामुळे आत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये चेंगराचेंगरी झाली. अनेकांनी जीव वाचवण्यासाठी उंचीवरून उड्या मारल्या, ज्यात ते जखमी झाले. उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमधून एक अत्यंत हृदयद्रावक आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. लखनऊमधील अलीगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुरनिया भागात सोमवारी एका इमारतीला भीषण आग लागली. या दुर्घटनेत आतापर्यंत तब्बल १४ जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी झाली आहे. मृत पावलेले सर्वजण २० ते २४ वयोगटातील तरुण असल्याने संपूर्ण परिसरात आणि राज्यात शोककळा पसरली आहे. जिल्हाधिकारी, प्रशासकीय पथक आणि पोलीस दल घटनास्थळी उपस्थित आहेत. मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. राजधानी लखनौमधील अलिगंजच्या पुरानिया येथील एका कोचिंग सेंटरला सोमवारी भीषण आग लागली. आगीनंतर इमारतीत धूर पसरल्याने आत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये चेंगराचेंगरी झाली. अनेक विद्यार्थ्यांनी जीव वाचवण्यासाठी उंचीवरून उड्या मारल्या, ज्यात ते जखमी झाले. जिल्हाधिकारी (डीएम), प्रशासकीय पथक आणि पोलीस दल घटनास्थळी उपस्थित आहेत. बचावकार्य सुरू आहे. स्थानिकांनी इमारतीमधून अचानक धूर निघतांना पाहिल्याचे सांगितले. शेजाऱ्यांनी तात्काळ अग्निशमन दल आणि पोलिसांना याची माहिती दिली. आग झपाट्याने पसरली आणि संपूर्ण संकुल तिच्या भक्ष्यस्थानी पडले. माहिती मिळताच, अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आग विझवण्यास आणि विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यास सुरुवात केली. पोलीस आणि प्रशासकीय अधिकारीही घटनास्थळी उपस्थित होते.

मिळालेल्या माहितीनुसार, आगीतून वाचण्यासाठी अनेक मुले इमारतीवरून खाली पडली आणि गंभीररित्या भाजली.

# महत्वाच्या बातम्या

## उशिरा पोहोचल्याने दोन विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारला

**मुंबई :** नीट (NEET) परीक्षेसाठी काही मिनिटांचा उशीर दोन विद्यार्थ्यांच्या चांगलाच अंगलट आला. रविवारी (दि.२१) देशभरात NEET परीक्षा सुरू असताना, परळ येथील महर्षी दयानंद महाविद्यालयातील परीक्षा केंद्रावर उशिरा पोहोचलेल्या दोन विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. परीक्षा केंद्र प्रशासनाने नियमानुसार ठरलेल्या वेळेनंतर मुख्य प्रवेशद्वार बंद ठेवले. त्यामुळे संतप्त विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी केंद्राबाहेर नाराजी व्यक्त केली. प्रवेश नाकारण्यात आलेल्या विद्यार्थ्यांपैकी एक विद्यार्थी कुर्ला येथील तर दुसरा डोंबिवली परिसरातील असल्याची माहिती समोर आली आहे.

## 'आधी पुनर्वसन, मगच कारवाई!, गरीबांच्या पोटावर बुलडोझर का?'

**यवतमाळ :** ऐन पावसाळ्याच्या तोंडावर स्थानिक नेताजी मार्केट परिसरातील फुटपाथ दुकानदारांवर नगर परिषदेने सुरू केलेल्या दडपशाही आणि अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात आज सोमवारी यवतमाळ शहरात जनक्षोभ उसळला मिळाला. विदर्भ अन्याय निवारण समितीच्या नेतृत्वाखाली शेकडो संतप्त अतिक्रमणधारक, छोटे व्यापारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी रस्त्यावर उतरत प्रशासनाच्या हुकूमशाही कारभाराचा तीव्र निषेध केला. 'आधी पुनर्वसन, मगच कारवाई!, गरीबांच्या पोटावर बुलडोझर का?' अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून सोडला होता. नेताजी मार्केट परिसरात तब्बल ४० ते ५० वर्षांपासून प्रामाणिकपणे व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा गाडा हाकणाऱ्या लहान दुकानदारांना अचानक बेघर केले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या छळवादी कारवाईमुळे सुमारे २०० हून अधिक कुटुंबे रस्त्यावर येणार असून, ३०० हून अधिक सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताचा रोजगार हिरावला जाणार आहे. पर्यायी जागेची कोणतीही व्यवस्था किंवा पुनर्वसन न करता थेट बुलडोझर चालवणे हा गरिबांच्या जगण्याच्या अधिकारावर घाला आहे, अशी संतप्त भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

## ९ बरगड्या तुटल्या, फुफ्फुसाला इजा, चेस्ट ड्रेन लावून दिली 'नीट' परीक्षा

**कोलकाता :** भीषण कार अपघातातून बचावलेल्या सृष्टी दुबेने देखील रविवारी ही परीक्षा दिली. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या विशेष पुढाकारामुळे सृष्टीसाठी परीक्षा केंद्रावर खास व्यवस्था करण्यात आली. १४ जून रोजी झालेल्या अपघातात सृष्टीला गंभीर दुखापत झाली होती. तिच्या छातीच्या ९ बरगड्या तुटल्या होत्या, फुफ्फुसाला गंभीर इजा झाली होती, एका मोठ्या रक्तवाहिन्याची शस्त्रक्रिया देखील तिच्यावर करण्यात आली होती. काही काळ सृष्टीला व्हेंटिलेटर सुद्धा ठेवण्यात आले होते.

# निपाह विषाणूवर सुरू असलेल्या चर्चेचे राजकीय वादात रूपांतर




**तिरुवनंतपुरम :** सोमवारी केरळ विधानसभेत संसर्गजन्य रोगांच्या प्रसारावरील चर्चेचे रूपांतर दोन प्रमुख राजकीय वारसांमधील तीव्र राजकीय संघर्षात झाले. निपाह विषाणूवरील चर्चेदरम्यान, सीपीआय(एम)चे आमदार आणि माजी मुख्यमंत्री पिनारयी विजयन यांचे जावई मोहम्मद रियास आणि राज्याचे आरोग्य मंत्री व माजी मुख्यमंत्री के. करुणाकरन यांचे पुत्र के. मुरलीधरन यांनी सरकारच्या परिस्थिती हाताळणीवरून एकमेकांवर तीव्र आरोप-प्रत्यारोप केले. राज्यातील संसर्गजन्य रोगांच्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी रियास यांनी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली होती. तथापि, या विषयावर तातडीच्या चर्चेची आवश्यकता नसल्याचे सांगून अध्यक्षांनी हा प्रस्ताव फेटाळला. या चर्चेमुळे केरळच्या राजकारणातील दोन पिढ्या आमनेसामने आल्या. रियास यांनी डाव्या नेतृत्वाच्या वारशाचे प्रतिनिधित्व केले, तर माजी मुख्यमंत्री के. करुणाकरन यांचे पुत्र मुरलीधरन यांनी सत्ताधारी पक्षाकडून सरकारचा बचाव केला. रियास यांनी आरोप केला की, केरळचे प्रसिद्ध आरोग्यसेवा मॉडेल एका कठीण टप्प्यातून जात आहे आणि आरोग्य विभागात समन्वयाचा अभाव आहे. त्यांनी दावा केला की, चार जिल्ह्यांमध्ये जिल्हा वैद्यकीय अधिकारी नाहीत आणि कोझिकोडमध्ये, जिथे पूर्वी निपाची प्रकरणे नोंदवली गेली होती, तिथे पुरेशा वैद्यकीय नेतृत्वाचा अभाव आहे.'सरकार कोझिकोडसाठी एक साधा वैद्यकीय अधिकारीसुद्धा देऊ शकले नाही का?' असा प्रश्न रियासने विचारला आणि आरोप केला की, रोग प्रतिबंधक उपाययोजना मजबूत करण्याऐवजी विभाग बदल्या आणि नेमणुकांमध्ये व्यस्त आहे. रियासने असा दावा केला की, विरोधी पक्षाने हा मुद्दा उपस्थित केल्यानंतरही, निपा रोगाची नोंद झाल्यानंतर पाच दिवसांनी राज्यात त्यावरची औषधे आली.

# आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सातव्या दिवशीही कायम



**नागपूर :** मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सोमवारी सातव्या दिवशीही कायम राहिला असून नागपूरसह राज्यभरातील आर.टी.ओ. कार्यालयांमधील कामकाजावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे. वाहन नोंदणी, वाहनचालक परवाने, वाहन हस्तांतरण, विविध परवानग्या, कराशी संबंधित कामे आणि इतर अनेक सेवा ठप्प झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. नागपुरातील शहर आर.टी.ओ., पूर्व नागपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि नागपूर ग्रामीण कार्यालयातील कर्मचारी सोमवारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलनाला बसले. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने ९ जून रोजी राज्यव्यापी लाक्षणीक संप पुकारला होता. त्यानंतर प्रशासनाकडून मागण्यांवर कोणताही ठोस निर्णय न झाल्याने १६ जूनपासून बेमुदत संप सुरू करण्यात आला. बेमुदत संपामुळे राज्यभरातील आर.टी.ओ. कार्यालयांमधील दैनंदिन कामकाज जवळपास ठप्प झाले आहे. वाहन नोंदणी, वाहनचालक परवाना नूतनीकरण, नवीन परवाने, वाहन मालकी हस्तांतरण, फिटनेस प्रमाणपत्रे, परवाने, कराशी संबंधित कामे आणि इतर अनेक सेवा प्रभावित झाल्या आहेत. कामासाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करूनही काम होत नसल्याने परत जावे लागत आहे. नागपुरातील आरटीओ कार्यालयातही स्थिती कायम आहे. आंदोलनात नागपूर मोटार वाहन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मंगेश कडू, प्रशासकीय अधिकारी प्रशांत रामटेके, गजानन राठोड, अतुल ढाकरे, रजनी नेवारे, ओम बांद्रे यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले होते. कर्मचारी संघटना सेवा प्रवशोत्तर नियम तातडीने लागू करणे, आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत कालबद्ध पदोन्नती, पदनाम बदल, वर्ग-दोन प्रशासकीय अधिकारी पदावरील पदोन्नती, प्रतिनियुक्तीवरील बदल्या आणि इतर प्रलंबित प्रशासकीय प्रश्न सोडविण्याची मागणी करीत आहे. तसेच विभागातील ५६ कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती रद्द करून त्यांना पदावनत करण्यात आल्याबद्दलही कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

# केंद्रीय औषध प्रयोगशाळेच्या अहवालात १५९ औषधे गुणवत्ता चाचणीत अयशस्वी



**नवी दिल्ली :** आरोग्य मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले की, केंद्रीय औषध प्रयोगशाळांना त्यांच्या मे महिन्याच्या औषध सतर्कता अहवालात विविध कंपन्यांनी उत्पादित केलेले ४६ औषधांचे नमुने निकृष्ट दर्जाचे आढळले आहेत. याव्यतिरिक्त, राज्यस्तरीय औषध चाचणी प्रयोगशाळांनाही ११३ औषधांचे नमुने NSQ (निकृष्ट दर्जाचे नसलेले) आढळले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की, ही माहिती दर महिन्याला केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेच्या (CDSCO) पोर्टलवर नियमित देखरेख प्रक्रियेअंतर्गत प्रसिद्ध केली जाते.जेव्हा औषधाचा नमुना एक किंवा अधिक स्थापित गुणवत्ता मानकांमध्ये अयशस्वी ठरतो, तेव्हा त्याला NSQ मानले जाते. तथापि, हा दोष केवळ तपासलेल्या विशिष्ट बॅचपुरता मर्यादित असतो. याचा अर्थ असा नाही की बाजारात उपलब्ध असलेल्या त्याच औषधाची सर्व उत्पादने सदोष आहेत.

आसाममधील औषधाचा एक नमुना बनावट असल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांच्या मते, हे औषध अनधिकृत उत्पादकांनी दुसऱ्या कंपनीच्या ब्रँड नावाचा वापर करून तयार केले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, तपास सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कायदा आणि नियमांनुसार खटला चालवला जाईल.

तज्ज्ञांनी सर्वात मोठी आव्हाने सांगितली. निकृष्ट दर्जाची औषधे बाजारातून हटवली जाणार. आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, एनएसक्यू (NSQ) आणि बनावट औषधे ओळखण्याची ही मोहीम राज्य नियामक संस्थांच्या सहकार्याने नियमितपणे राबवली जाते, जेणेकरून अशी औषधे ओळखून ती बाजारातून हटवता येतील.

# जिल्हा कारागृहाचा होणार कायापालट



**वर्धा :** कैदी म्हणजे असा जीव जो सर्व सोयीपासून वंचित. स्वातंत्र्य हिरावलेला. बंदिस्त खोलीत एकटा नव्हे तर गर्दीत जगणारा. मोकळी हवा हे त्याच्यासाठी दु:स्वप्न. कारण कारागृहात क्षमतेपेक्षा अधिक कैदी ठेवल्याची ओरड नेहमीची. म्हणून होणाऱ्या मारामाऱ्या सदा बातमीत उमटतात. आता शहराच्या मध्यवस्तीत आलेली. पण नवे कारागृह व्हावे हा विचारच दुर्मिळ. मात्र एका जिल्ह्यात दीर्घ सजेचे कैदी नवे घर पाहू शकतील. तर हे कैदी वर्धा जिल्ह्यात नवे घर बघणार. वर्धा जिल्हा कारागृहासाठी इंझापूर येथे शासनाकडून जमीन मंजूर झाली आहे. जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेला नवीन जिल्हा कारागृह उभारणीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १७ जून २०२६ रोजी शासन निर्णय जारी करून मौजा इंझापूर येथील सुमारे १२० एकर जमीन वर्धा जिल्हा कारागृहाच्या बांधकामासाठी मंजूर केली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामागे राज्याचे गृह राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विशेष पुढाकार निर्णायक ठरला आहे.

PROPERTY FOR RENT/ LEASE
AVAILABLE ON RENT/ LEASE AT PRIME LOCATION
COMMERCIAL PROPERTY
Total Plot Area: 50,000 Sq.Ft.
Constructed Area: 30,000 Sq.Ft.
LOCATION: WELA (HARI), SHANKARPUR ROAD
IDEAL FOR
• Hostel/ Student Accommodation • New College/ Educational Institution • Residential College Campus
• Car/ Motorcycle Showroom • Warehouse / Godown
• Supermarket (D-Mart Type)
CONTACT
DR. KAMBLE: 9422539451

# महिला सुरक्षा 'पॉश' कायद्याबाबत सरकारचे परिपत्रक




**अकोला :** महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी लागू असलेल्या 'कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ (POSH Act)' च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले. या परिपत्रकानुसार विविध स्तरांवरील शासकीय अधिकाऱ्यांना आस्थापनांची तपासणी व कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्राधिकृत केले. अधिकाऱ्यांकडून नियमित तपासणी झाल्यास गैरप्रकारावर आळा बसू शकेल.

१० पेक्षाअधिक कर्मचारी तर अंतर्गत तक्रार समिती; ५० टक्के महिला सदस्य ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्या ठिकाणी अंतर्गत तक्रार समिती (Internal Committee) स्थापन करणे बंधनकारक आहे. तसेच १० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या कार्यालये व संस्थांमधील महिलांच्या तक्रारींच्या निवारणासाठी जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार समिती (Local Committee) कार्यरत आहे. अंतर्गत समितीमध्ये वरिष्ठ महिला अध्यक्ष, महिलांच्या प्रश्नांशी संबंधित कार्याचा अनुभव असलेले किमान दोन सदस्य तसेच लैंगिक छळ विषयक कामाचा अनुभव असलेली बाह्य सदस्य यांचा समावेश असणे आवश्यक आहे. समितीतील किमान ५० टक्के सदस्य महिला असणे बंधनकारक असेल. समितीचा कार्यकाळ तीन वर्षांचा राहील.

ज्या कार्यालयांमध्ये दहा पेक्षा कमी कर्मचारी आहेत, त्यांनी आपल्या तक्रारी स्थानिक तक्रार समितीकडे दाखल करता येतील. तसेच पीडित महिला केंद्र शासनाच्या 'She-Box' या ऑनलाइन पोर्टलवरही तक्रार नोंदवू शकतात. खासगी, सरकारी, निमसरकारी तसेच महामंडळ आस्थापनांची तपासणी करण्यासाठी १४ मेच्या शासन निर्णयामध्ये जिल्हा अधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी, विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (जिल्हा परिषद), बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी, ग्रामीण व आदिवासी), जिल्हा परिविक्षा अधिकारी, परिविक्षा अधिकारी, संरक्षण अधिकारी जिल्हास्तर व तालुकास्तर अंगणवाडी पर्यवेक्षिका आदींना प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

23 June 2026 page 03-1_Layout 1 6/22/2026 5:26 PM Page 1



# मी पाहिलेले बोधिरत्न नायक महाथेरो

**बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारासाठी आपले आयुष्य वेचणारे प्रसिद्ध बौद्धाचार्य एन. बोधिरत्न नायक महाथेरो यांचे नुकतेच परिनिर्वाण झाले. पूज्य भन्तेजींच्या पार्थिव देहावर 23 जून रोजी अमरावती रोडवरील नागवन महाविहार परिसरात आदरणीय भिक्खूसंघ आणि हजारो उपासक-उपासिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार होत आहेत त्यानिमित्ताने...**

**1975** चा तो काळ. बोधिरत्न महाथेरो अर्थात पूर्वाश्रमीचे भीमराव नगरकर यांचे बालपण पश्चिम नागपुरातील गोपालनगर परिसरात गेले. तेव्हा हा परिसर ‘दीक्षानगर’ नावाने ओळखला जायचा. आई सुगंधाबाई आणि वडील वैजनाथ यशवंत नगरकर यांच्या पोटी भीमरावाचा जन्म 2 फेब्रुवारी 1972 रोजी नांदागोमुख सावनेर, जि. नागपूर या ठिकाणी झाला. कालांतराने नगरकर परिवार गोपालनगर परिसरात स्थायिक झाला. वडील वैजनाथ एक उत्कृष्ट गायक होते. भीमप्रकाश सेवा भजन मंडळात ते वीणेवर आपल्या गोड आवाजात अभंग गायचे. आई देखील सुंदर पाळणा गायची. तोच वारसा पुढे बाल भीमरावाने चालविला. पुंडलिकराव सूर्यवंशी, रामाजी गोंडाणे, शंकर बागडे, नारायण गजभिये, लक्ष्मण गजभिये, गणपत गजभिये, नामदेव गेडाम या वडीलधाऱ्यांच्या सहवासात त्यांचे बालपण अभंगमय झाले. या कवींच्या भजनात भीमराव देहभान विसरायचे. अशा प्रकारे त्यांना भजनाची गोडी लागली. भीमरावाने डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या हस्ते भिक्खूसंघाची 1988 साली विधिवत धम्मदीक्षा ग्रहण करून ‘बोधिरत्न’ हे नाव धारण केले. त्याच काळात माझ्या वडिलांनी (स्मृतिशेष दाजीबाजी मानकर) मोठ्या वडीलबंधूच्या स्मृतिप्रित्यर्थ ‘विनायक स्मृती वाचनालय’ सुरू केले होते. त्यावेळी बोधिरत्न माझ्या मोडक्या झोपडीत येऊन वडिलांसोबत तासन्तास धम्मचर्चा करायचे. प्रगाढ मैत्रीचे हे अतूट ऋणानुबंध भन्तेजींनी सुगंधित फुलाप्रमाणे शेवटपर्यंत जपले. वडिलांचे 1990 साली निधन झाले तेव्हा बोधिरत्न पाच भिक्खूंसोबत ‘बुद्धं सरणं गच्छामि...’चा जयघोष करीत हळुवारपणे पाऊले टाकीत घरी आले होते. तेव्हा त्यांच्या डोईवर पिवळ्या रंगाची सुंदर छत्री होती. ते मनोहारी दृश्य पाहून उपस्थित आणि परिसरातील लोक भावुक झाले होते. क्षणभर त्यांना दुःखाचा विसर पडला होता. त्यानंतर अनेकदा भन्तेजींचा माझ्या घराला पदस्पर्श झाला. भन्तेजी जेव्हा जेव्हा घरी यायचे तेव्हा तेव्हा मन गदगदून यायचे आणि वाटायचे की आज काही तरी चांगले घडणार! प्रत्येक भेटीत भन्तेजींचा ओठावर बुद्ध-बाबासाहेब असायचे. भन्तेजी सांगायचे की, चंद्रपूरच्या प्रवासात प्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटे यांच्यासोबत काही मोजके क्षण का असेना सहवासात राहण्याचे, त्यांच्याशी मधुर संवाद साधण्याचे मला भाग्य लाभले, त्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो. या हृदयंगम भेटीत भन्तेजींनी बाबा आमटे यांच्या डोक्यावर डॉ. बाबासाहेबांचा पवित्र अस्थीकलश धरला होता आणि तेव्हा बाबा आमटे म्हणाले, ‘“भन्ते बोधिरत्ना, आज माझ्या आयुष्याच्या सारा शीण दूर झाला. येथे प्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले आहेत. त्यांचा अस्थीकलश माझ्या डोक्यावर ठेवा.” थायलंडची उपासिका मॅथम संथना यांचा वारंवार उल्लेख भन्तेजी करीत. थायलंडच्या वास्तव्यात असताना महाउपासिका मॅडम संथना यांनी मला थाई भाषा शिकविली आणि म्हणाली होती, ‘भन्तेजी, तुम्ही माझ्यासाठी एवढीच प्रार्थना करा की, यानंतर जर मला जन्म प्राप्त व्हावयाचा असेल तर तो भारताच्या बुद्धभूमीत व्हावा!’ अशा अनेक आठवणी सांगण्यात ते रममाण व्हायचे. माझ्या मुलांसाठी (डॉ. रोहन आणि कु. तनिष्का) ते खाऊ आणायचे. त्यांना प्रेमाने कुरवाळून उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन करायचे. गोड, मधुर आवाजात मंगलमय सुत्तपाठ घ्यायचे. घरी पाऊल ठेवताच पत्नी वंदना त्यांचा आदरसत्कार करून विचारायची, ‘भन्तेजी आज काय घेणार?’ त्यावर भन्तेजी म्हणायचे, ‘ताई मी आलूपोहे घेईन.’ मला तुमच्या हातचे आलूपोहे फार आवडतात. मला इथे लिहिताना अश्रू अनावर होत आहेत, ‘मृत्यूच्या पंधरा दिवसापूर्वी भन्तेजींनी अखेरचा नाश्ता (आलूपोहे) माझ्या घरी केला होता.’ गाय जशी वासराकडे धाव घेते त्याचप्रमाणे कठीणप्रसंगी भन्तेजी उपासकांच्या मदतीला धावून जायचे. त्यांना धीर द्यायचे. भन्तेजींनी मला केलेली आर्थिक मदत आयुष्यभर मी विसरू शकत नाही. त्यांच्या कृपाप्रसादाने माझ्या डोळ्यावर यशस्वी शस्त्रक्रिया झाली. त्यांचे हजारो अभंग, लेख, भावस्पर्शी आठवणी आणि ‘प्रज्ञावृक्षाची अग्नीफुले’, ‘अभंगाचा क्रांतिवृक्ष’, ‘बोधिरत्नाची काव्यफुले’ आणि ‘माय मराठी काव्यदर्शन’ संगणकावर पुस्तकरूपाने तयार करू शकलो हे सारे घडले भन्तेजींच्या आशीर्वादामुळे... महाविनाशकारी करोनाच्या काळात वर्षभर पुरेल एवढा अन्नधान्याच्या साठा भन्तेजींनी जीवाची पर्वा न करता माझ्या घरी आणून दिला होता. मी पाहिलेले, अनुभवलेले पूज्य बोधिरत्न महाथेरो असे करुणा आणि प्रेमाने ओथंबलेले होते. बौद्ध धम्माच्या अविरत प्रचार-प्रसाराकरिता त्यांनी अनेक बौद्ध राष्ट्रांचा धम्मप्रवास केला. थायलंड, श्रीलंका, कंबोडिया, मंगोलिया, लाओस इत्यादी देशांना त्यांनी भेटी दिल्या. प्रत्येक प्रवासाचा ‘ऑखो देखा हॉल’ ते मला दूरध्वनीवरून सांगायचे. बोधिरत्न भन्तेनी मला स्वतःच्या गाडीवर बसवून कामठी रोडचे बुद्धभूमी महाविहार, भानेगाव बुद्धविहार आणि निसर्गरम्य नागवनचा सुरम्य प्रवास घडविला. जीवनातले ते रोमांचकारी स्वर्णिम प्रसंग आजही डोळ्यासमोर येतात. मला आजही चांगले आठवते त्या दिवशी डॉ. भदन्त आनंद कौसल्यायनजींचा स्मृतिदिवस होता. विहारात भिक्खूसंघ बसला होता आणि बाहेर पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. त्याचवेळी बोधिरत्नाचे बुद्धभूमीत आगमन झाले. ते पावसाने ओलेचिंब भिजले होते. ते मला म्हणाले, ‘मिलिंदजी, भन्तेजींना वंदन करून आपण निघू या.’ पावसातच त्यांनी मला गाडीवर बसवले आणि भानेगावच्या बुद्धविहारात आलो. त्यावेळी विहारात कुशीनगरचे पूज्य भदन्त ज्ञानेश्वर महाथेरो होते. त्यांना त्रिवार वंदन करून पुढच्या प्रवासाला निघालो. त्यावेळी प्रसिद्ध अभिनेता राजेश खन्ना आणि अभिनेत्री हेमा मालिनी यांच्यावर चित्रित झालेले ‘जिंदगी एक सफर है सुहाना... यहाँ कल क्या होगा? किसने जाना...’ हे लोकप्रिय गीत सारखे ओठावर येत होते. पावसातच ओलेचिंब भिजत संपूर्ण कोराडी खापरखेड्याला फेरफटका मारून भन्तेजींनी मला सुरक्षितपणे आणले. ‘नागवन’ची यात्रा फारच संस्मरणीय झाली. नागवनात 2018 साली भन्तेजींनी सहपरिवारासाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. शीलवान पूज्य भदन्त बोधिरत्न यांनी 16 जून 2026 रोजी धम्मसेवेतच नश्वर देहाचा त्याग केला. मृत्यूच्या दोन दिवसापूर्वी त्यांची दोन पत्रे मी टाइप करून दिली होती. ‘मिलिंदजी मी बरा झालो... मला दवाखान्यातून सुट्टी झाली...’ साखरकरांच्या घरी मुक्कामाने आहे’ हे त्यांचे अखेरचे शब्द आणि लगेच वायुवेगाने त्यांच्या मृत्यूची बातमी कानावर पडली. भन्तेजी शरीराने जगाला पारखे झाले तरी स्मृतीरूपाने ते कायम अनुयायांच्या हृदयात राहतील. त्यांचे प्रेरणादायी अभंग, लेख, हस्तलिखित डायऱ्या आणि दुर्मिळ छायाचित्रे त्यांच्या वैभवशाली स्मृतीची सतत आठवण करून देत राहतील. श्रीलंकेतील ‘रेडिओ सिलोन’वरून त्यांनी अनेक वर्षे धम्मप्रचार केला. भारतात अनेक धम्म परिषदा, वर्षावास कार्यक्रम आणि धम्मदेशनेतून त्यांनी बुद्ध आणि डॉ. बाबासाहेबांची विचारधारा जनसामान्यापर्यंत पोहोचवली. भिक्खू संघातील दीर्घ साधना आणि सेवेमुळे त्यांना ‘महाथेरो’ व ‘नायक’ या मानाच्या पदव्या प्राप्त झाल्या. घरासमोर पाऊल ठेवताच ‘घरी आहेत का मिलिंदजी’ हा भन्तेजींचा नादमधुर स्वर पुन्हा कानी ऐकू येणार नाही. महान गीतकार शैलेंद्रजी सांगून गेले, ‘जाने वाले कभी नही आते, जाने वाले की याद आती है’ या सत्यवचनाने डोळे अश्रूंनी पाणावले आहेत. आज, 23 जून 2026 रोजी पूज्य बोधिरत्न महाथेरो यांच्या पार्थिव देहावर अमरावती महामार्गावरील नेरीमानकर येथील ‘द इंटरनॅशनल बुद्धिस्ट धम्मदूत सोसायटी’च्या नागवन महाविहाराच्या परिसरात आदरणीय भिक्खूसंघ आणि हजारो उपासक-उपासिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार होत आहेत. साधु! साधु!! साधु!!! सहजे उपाधी जन्म जरा व्याधी तनू-मनीसाधी ।। निरुपाशी ।। मनासी या छेदू विकरती भेदू ।। निब्बाण ते शोधू ।। आपल्यात ।। देह उलंडला घागरी भरला ।। विकार सांडला ।। भ्रमंताचा ।।तुटली बंधने धम्माती वंदने ।। त्या प्रतिपदेने ।। चित्ती सुख ।।बोधिरत्न म्हणे सफल वंदना ।। तुझी रे चंदना ।। बुद्धासाठी ।। भन्तेजींच्या पावन स्मृतीला आणि त्यांच्या धम्मकार्याला त्रिवार अभिवादन. मानाचा मुजरा.●●






मिलिंद मानकर
मो. 8177866397

## पती

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

**मा**यबापाच्या मृत्यूनंतर भाऊबीजेला ओवाळणीसाठी आलेल्या आपल्या भावाला ती म्हणाली “जेव्हा आई जगाचा निरोप घेते त्यानंतर मनापासून आशिर्वाद देणारी आणि आपल्या कल्याणाची सदैव मनोकामना करणारी दुसरी कोणतीही व्यक्ती जगात नसते तसेच वडील सोडून गेले तर हिंमत, प्रोत्साहन देणारे कुणीच नसते. त्यावर तिचा भाऊ म्हणाला “ ताई! तू म्हणतेस ते अर्धसत्य आहे. खरी गोष्ट अशी आहे की, पिता आणि पती या दोन नात्यांशी गृहीणीची नाळ जुळलेली असते. ज्यांनी कुणी भाषा बनवली त्यांनी खुप विचार करून या दोन शब्दांची निर्मिती केली आहे. हा केवळ योगायोग नाही. पिता आणि पती यामध्ये ‘प’ आणि ‘त’ ही दोन अक्षरे सामावलेली आहेत. याचे कारण म्हणजे ‘पिता’आणि ‘पती’ हे दोघेही मनापासून प्रेम करतात. काळजी आणि रक्षण करतात. तसेच पालनपोषण देखील करतात. यामध्ये पिता हा जन्मदाता तर पती जिवनसाथी असतो. एकाचे प्रेम हे वात्सल्यपूर्ण असते तर दुसऱ्याचे दांपत्यपूर्ण असते. पण या दोन्ही नात्यांत फरक फक्त एवढाच आहे की, पित्याचे प्रेम हे निःस्वार्थ असते तर पतीला प्रेमाच्या मोबदल्यात प्रेम हवे असते. तुझ्या सुखी संसाराकडे बघून मला वाटते की तुला एक आदर्श पती लाभला आहे. तु खरेच खूप भाग्यवान आहेस. ‘पिता और पती के रिश्ते का, कोई जवाब नही होता, इनके निगाहों में, और कोई ख्वाब नहीं होता, मत पूछो ये कितना प्यार करते हैं, इतना ही जानो कि, इनकी मोहब्बत का कोई हिसाब नही होता”.●●

# ऑपरेशन लोटस नव्हे, ऑपरेशन संविधान!

**अब की बार चारसौ पार'च्या वल्गना करणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या अश्वमेधाचा वारू भारतीय जनतेने २०२४च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सर्व ताकदीनिशी रोखला आणि त्यांना चंद्राबाबू नायडू आणि नीतीश कुमार या दोन कुबड्यांच्या आधारावर कारभार चालवायला भाग पाडले.**

**अ**ब की बार चारसौ पार'च्या वल्गना करणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या अश्वमेधाचा वारू भारतीय जनतेने २०२४च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सर्व ताकदीनिशी रोखला आणि त्यांना चंद्राबाबू नायडू आणि नीतीश कुमार या दोन कुबड्यांच्या आधारावर कारभार चालवायला भाग पाडले. अशावेळी आघाडी सरकारचा धर्म पाळण्याची सुबुद्धी या सरकारला सुचेल आणि बेलगाम सत्तेची हाव आटोक्यात येईल, असे मतदारांना, विश्लेषकांना वाटले होते. मात्र, देशाची संपूर्ण सत्ता ताब्यात घेऊन संविधानिक रचनेची संपूर्ण मोडतोड करून टाकल्याशिवाय आपले नापाक इरादे सफल होणार नाहीत, हे लक्षात आलेल्या भाजपने आता सगळ्या लोकशाही यंत्रणा बटीक बनवून, जनादेश मिळत नसताना 'ज्ञानादेश' मिळवण्याचा राक्षसी मार्ग अवलंबला आहे. सत्तेचा भस्म्या रोग झालेला हा पक्ष शिवसेनेच्या फुटीपासून सुरू झालेले हे तंत्र आता किती निर्लज्जपणे आणि उघडपणे राबवू लागला आहे, ते आम आदमी पार्टीवर केलेल्या आघातापाठोपाठ तृणमूल कॉंग्रेसमध्ये पाडण्यात आलेल्या फुटीतून दिसून येते आहे. वास्तविक पाहता भाजपच्या सत्ताकाळात देशात एकही गोष्ट धड सुरू नाही. नीट, सीबीएसई, सीयूईटी आदी परीक्षांचे पेपर फुटीप्रकरण, महागाई, रोजगार, शेतकऱ्यांचे आत्महत्यांचे सत्र, डॉलरपुढे धारातीर्थी रुपया, बकासुरासारखा अदानीला गिळंकृत करायला दिलेला देश, माउंट एव्हरेस्टच्या उंचीला लाजवणारा भ्रष्टाचार, भाजपला आलेली अवास्तव पैशांची सूज अशी मोदींची उतरती भाजणी आहे. देशातील विरोधी पक्षांची 'इंडिया' आघाडी या गैरप्रकारांच्या विरोधात आक्रमक झाली आहे. त्याचवेळी (नेमकी कोणत्या राजकीय उद्देशाने आणि कोणाच्या सोयीने, ते अद्याप स्पष्ट झालेले नाही) तरुणांची कॉक्रोच जनता पार्टी रस्त्यांवर उतरली आहे. या घटना पाहिल्या की २०११ची आठवण होते. तेव्हाही तीन वर्षांनी लोकसभा निवडणूक होणार होत्या. आताही तितकाच काळ शिल्लक आहे. २०२९मध्ये भाजपची अवस्था काय असेल याचे दर्शन देशातल्या अस्वस्थ वर्तमानातून सुरू झालेल्या आंदोलनांमधून घडते आहे. भाजपच्या बाजूने निवडणूक आयोग, न्यायपालिका, ईडी, सीबीआय, आयकर, पोलीस, इडियट बॉक्सवरचा आणि अनधिकृत मुखपत्रांमधून रांगत चाललेला चाटुकार गोदी मीडिया अशा सर्व यंत्रणा आहेत. मेंदूगहाण ट्रोल भक्तांचीही वानवा नाही. तरीही त्यांना पराजयाची भीती का वाटावी? २०२९च्या निवडणुकीच्या आधीच उरलेसुरले कुटील डावपेच वापरण्याची धडक मोहीम का सुरू करण्यात आली आहे? मारून मुटकून, धाकदपटशा दाखवून, निवडणुका चोरून, राज्यसभेच्या जागा चोरून, अन्य पक्षातील खासदारांचे लचके तोडून हा खोटा पाठिंबा उभा करायचा आहे तो कशासाठी? भाजपला सत्तेत टिकून राहायचे असल्यास मतदारसंघांच्या सीमांची पुनर्रचना करणे क्रमप्राप्त ठरते. यात यंत्रणांचा वापर करून भाजपसाठी अनुकूल ठरत असलेल्या उत्तर प्रदेश आणि हिंदीबहुल प्रदेशात लोकसंख्येनुसार अधिक मतदारसंघ निर्माण करण्याचा घाट घातला जातो आहे. अधिक सुशिक्षित, संपन्न आणि धार्मिक सलोख्याने राहणाऱ्या दक्षिण भारताला देशाच्या राजकारणातून बेदखल करून सगळ्या देशाचा गोपट्टा बनवून टाकण्याचा हा कुटील डाव आहे. त्यासाठी भाजपला संसदेत दोन तृतियांश मतांची भूक आहे. अर्थात भाजपकडे त्यासाठी लोकसभेत ३६३चा आकडा असावा लागेल. हा आकडा गाठण्यासाठीच हा जिवाचा आटापिटा सुरू आहे.




**राज्यघटना बदलणार! :** भाजपच्या काही नेत्यांनी वारंवार देशाची राज्यघटना बदलण्याची गरज व्यक्त केली आहे. अयोध्येतील भाजपचे खासदार लल्लू सिंह यांनी राज्यघटना बदलासाठी दोन तृतियांश खासदारांची गरज असल्याचे वक्तव्य केले होते. दलित, अल्पसंख्याक आणि मागासवर्गीयांना मिळालेले आरक्षण राज्यघटना बदलून नाहीसे करण्याचा डाव भाजपा रचत आहे. चारपाच टक्के वर्चस्ववादी लोक देशातील ९० ते ९५ टक्के लोकांना पुन्हा गुलामगिरीत ढकलू इच्छितात, असा आरोप अखिलेश यादव यांनी तेव्हा केला होता. रामायण मालिकेतून घराघरात प्रभू श्रीराम पोहचवणारे अभिनेता अरुण गोविल हे भाजपचे मेरठ मतदारसंघातून खासदार आहेत. त्यांच्या मते राज्यघटनेची तेव्हाची आणि आताची गरज यात फरक आहे. त्यामुळे सर्वसंमतीने विकासासाठी बदल झाले तर त्यात आश्चर्य कशाचे? भाजपचे कर्नाटकातील नेते अनंतकुमार हेगडे. राजस्थानमधील भाजप नेत्या ज्योती मिर्धा यांनीही राज्यघटना बदलासंदर्भात वक्तव्ये केली होती. भाजपच्या पोटातले ओठावर येते ते असे. संख्याबळ वाढवण्यासाठी आताच जर हालचाली केल्या नाही तर २०२९ नंतरचा काळ भाजपच्या अनेक नेत्यांसाठी कठोर असणार आहे. ही वेळ येऊ नये म्हणूनच आरपारच्या लढाईचा मार्ग स्वीकारलेला दिसतो. मध्य प्रदेशचे उदाहरण घ्या. काँग्रेसच्या मीनाक्षी नटराजन यांचा राज्यसभा उमेदवारीचा अर्ज रद्द करण्यात आला. नियमानुसार कोणतेही कारण नव्हते. तिथल्या तिन्ही जागा भाजपने जिंकल्याचे निवडणूक अधिकाऱ्याने जाहीर करून टाकले. नटराजन यांचे ऐकायला निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय तयार नाही. किती दबाव आहे मोदींचा या यंत्रणावर. कसेही करून कोणत्याही मार्गाने सभागृहातील संख्याबळ वाढवणे हाच मोदी, शहा यांचा हेतू आहे. आता प्रादेशिक पक्षांना भाजपने लक्ष्य केले आहे. एकतर भीतीने आणि दुसरे आमिषाने प्रादेशिक पक्षातील, राष्ट्रीय पक्षातील खासदार भाजपच्या गळाला लागलेले दिसतात. येत्या काळात ही संख्या वाढण्याची शक्यता अधिक आहे.

**प. बंगालचा राडा :** तृणमूल काँग्रेसने प. बंगाल विधानसभेची निवडणूक हरल्याला महिनाही उलटत नाही तोच या पक्षात अंतर्गत राडा झाल्याचे चित्र निर्माण करण्यात आले. तृणमूलच्या लोकसभेतील २८पैकी २० खासदारांनी आणि ८० पैकी ६० आमदारांनी ममता बॅनर्जीना टाटा बाय बाय करायचे ठरवले आहे. बाहेर का पडतो याचे खापर कोणावर तरी फोडले पाहिजे म्हणून पक्षाचे महासचिव आणि ममता बॅनर्जीचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांच्या दडपशाहीला कंटाळून हे केले जात असल्याचे सांगितले गेले आहे. पण यामागे भाजपची महाशक्ती आहे, हे सांगायची गरज नाही. भाजपच्या वॉशिंग मशीनमधून सुस्वच्छ होऊन बाहेर पडलेले सुवेंदू अधिकारी मुख्यमंत्री होताच त्यांनी चक्रे फिरवीत तृणमूल कॉंग्रेसमधील आमदार, खासदारांना गळाला लावायची खास योजना आखली. 'ऑपरेशन लोटस' ने ममता बॅनर्जीनी २८ वर्षात अथक परिश्रमाने उभारलेल्या पक्षाला सावज केले. यात पक्ष दुभंगला. ममतादीदींकडे नावापुरतेच आमदार खासदार शिल्लक राहिले. राज्यात विरोधी पक्षमुक्त विधानसभा अशीच जणू स्थिती निर्माण झाली आहे. ममता दीदींनी गेल्या २८ वर्षात अनेकांना मोठे केले. नेते केले. संसदेत आणि विधिमंडळात पाठवले. त्यांच्यासाठी दमदार प्रचार केला. बंगाली चित्रपटसृष्टीतील अभिनेते, अभिनेत्रींना, तरुणांना संधी दिली. त्यात शताब्दी रॉय, तापस पॉल, मुनमून सेन, दीपक अधिकारी, कारी, मिमी चक्रोबर्ती, नुसरत जहान, रचना बॅनर्जी, सयोनी घोष, जून मालिया, सोहम चक्रोबर्ती, कांचन मुलीक, बाबुल सुप्रियो, युसूफ पठाण, कीर्ती आझाद आणि ज्येष्ठ अभिनेते शत्रुघ्न सिन्हा आदींची नावे घेता येतील. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळेस अभिनेत्री सायोनी घोष स्टार प्रचारक होती. 'ममता का क्षमता, २०२६ में बंगाल आपको दिखायेगा, यह नाम याद रखिएगा, ममता बॅनर्जी बंगाल की नारी! हवाई चप्पल, सफेद साडी, एक नारी सौ पर भारी! खेला होगा, दिल्ली का लड्डू खाया है, बंगाल का रसगुल्ला खिलाकर आपको (मोदी) अबकी बार यमुना पार भेजेंगे!...' 'ये ताकद की बुलंदी भी पल भर का तमाशा है, जिस डाल पे बैठे हो वो टूट भी सकती है' बशीर बद्र यांचा हा शेर... मर्मभेदक शब्दांच्या प्रहाराने तिने मतदारांची मने जिंकली होती. भविष्यातील ममता बॅनर्जी म्हणून तिच्याकडे पाहिले गेले. 'आबार जितबे बंगला' म्हणणाऱ्या सायोनीने अचानक पोबारा केला. हे लोकप्रतिनिधी मतदारसंघात जातील तेव्हा जनक्षोभ विचित्र दिशा घेऊ शकते. त्यांना पळता भुई थोडी होईल. तृणमूल काँग्रेसच्या सुमारे २० बंडखोर लोकसभा खासदारांनी नॅशनलिस्ट सिटीझन्स पार्टी ऑफ इंडिया या त्रिपुरा-आधारित छोट्या पक्षात विलय केला आहे. हे १४ जून २०२६ रोजी घडले. बंडखोर गटाचे नेतृत्व काकोली घोष दस्तीदार या करीत आहेत. त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना भेटून यासंदर्भात पत्र सादर केले. या गटाने नियोजित डावपेचनुसार एनडीएला समर्थन दिले आहे. यामुळे एनसीपीआय हा पक्ष एनडीएमधील दुसरा सर्वात मोठा सहयोगी पक्ष बनला आहे. एनसीपीआय २०२२-२३मध्ये स्थापन झालेली त्रिपुरा-आधारित आणि पश्चिम बंगालमध्ये नोंदणीकृत छोटा पक्ष आहे. याचे संस्थापक, अध्यक्ष त्रिपुराचे माजी मंत्री पबन कुमार दास आहेत. यापूर्वी या पक्षाचा जराही प्रभाव नव्हता. २०२३ च्या त्रिपुरा विधानसभा निवडणुकीत या पक्षाने फक्त काहीशे मते मिळवली होती. तृणमूल काँग्रेस खासदारांच्या विलयामुळे ती अचानक राष्ट्रीय चर्चेत आली. महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जे झाले ते देशाने पाहिले आहे. त्यामुळे निवडणूक आयोग आणि न्यायपालिकांकडून न्याय मिळण्याची शक्यता नाही. ममता दीदींकडे अभिषेक बॅनर्जी, सौगत रॉय, सुदीप बंदोपाध्याय, कल्याण बॅनर्जी, महुआ मोईत्रा आणि शत्रुघ्न सिन्हा उरलेले दिसतात. राज्यसभेतील खासदार सुखेंदु शेखर रॉय, सुश्मिता देव, प्रकाश चीक बरेंक यांनी राजीनामे दिले आहेत. याचा अर्थच हा होतो की भाजपला राज्यसभा आणि लोकसभेत दोन तृतीयांश संख्याबळ जमवायचे आहे. ममता बॅनर्जी रस्त्यावरील लढाऊ नेत्या म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी राजकारणात अनेक चढउतार पाहिले आहेत. त्यांनी प. बंगालमध्ये अधिक हालचाली करू नये म्हणून त्यांना कोणत्या ना कोणत्या कारणाने तुरुंगात डांबले जाईल. परंतु ममता या पुन्हा उठून उभ्या राहण्याची क्षमता असणाऱ्या नेत्या आहेत. 'आबार जितबे बंगला' यासाठी पूर्ण तयारीनिशी मैदानात उतरली यात जराही शंका नाही. गेल्या दहा वर्षांत भारतात अनेक प्रमुख राजकीय पक्ष फोडण्यात आलेत. यात मुख्यतः महाराष्ट्र, बिहार, पंजाब, आंध्र-तेलंगणा, पश्चिम बंगाल आदी राज्यांतील पक्षांचा समावेश आहे. याचा फायदा भाजपला झाला आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, लोक जनशक्ती पार्टी हे जिवंत उदाहरण आहे. 'ऑपरेशन लोटस' ही भारतीय राजकारणातील एक चर्चित रणनीती आहे. जी भाजपने विरोधी पक्षांतील आमदार, खासदारांना तोडून किंवा फूट पाडून सरकारे बनवणे किंवा स्थिर करणे यासाठी वापरले आहे. २००८ मध्ये प्रथम कर्नाटकात वापरला गेला. भाजपला बहुमत नव्हते, तेव्हा जनार्दन रेड्डी यांच्या नेतृत्वात काँग्रेस आणि जेडीएसच्या आमदारांना तोडले. ७ आमदारांना राजीनामा द्यायला लावून पोटनिवडणुकीत जिंकले आणि सरकार स्थिर केले. कर्नाटकचे यशस्वी मॉडेल म्हणून ओळखले जाते. २०१४ला केंद्रात भाजप सत्तेत आल्यानंतर ही रणनीती वेगाने राबवली गेली. मध्य प्रदेशमध्ये ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या २२ समर्थकांसह काँग्रेस सरकार पडले. भाजप सरकार आले. २०१९ मध्ये कर्नाटकात १७ आमदार तोडून जेडीएस-काँग्रेस सरकार पाडले. महाराष्ट्राचा सत्ता संघर्ष असाच होता. गोवा, मणिपूर मधेही भाजपने हाच राडा केला. राज्ये मोठी असो की छोटी असोत प्रत्येक राज्यात केवळ भाजपचे सरकार असावे हा मोदी आणि शहांचा प्रण असतो. निवडणूक जिंकण्यासाठी भाजपकडून काय काय लबाडी केली जाते हे सातत्याने उघड होत असते. निवडणूक आयोग भाजपचे बाहुले झाल्याचे चित्र असते. आदर्श आचारसंहितेच्या काळांत अनादर्शचा कळस गाठला जातो. जातीय समुदायानुसार मतदारयादीतून मतदारांची नावे परस्पर गहाळ केली जातात, एसआयआरच्या नावाने भाजपसाठी उपयुक्त नाहीत अशांना मतदानाचा अधिकारच ठेवला जात नाही. पैशांचा महापूर असतो. आता तर निवडणुकीनंतर विरोधी पक्षांवर घाव घालण्याचा उघड तमाशा भाजपने सुरू केला आहे. भाजपचा कुटील डाव यशस्वी होतो की 'इंडिया' आणि जेन-झी लोकशाही अबाधित ठेवतात ते येत्या काळात दिसून येईल.●●

विकास झाडे

# तामिळनाडूतील बौद्ध अवशेषांची राजधानी - कांचीपुरम

**जगातील सर्वात प्राचीन व समृद्ध संस्कृती म्हणून जे काही प्रदेश आहेत त्यातील एक प्रदेश म्हणून तामिळनाडू आहे . या प्रदेशात ई. स. पूर्व १५०० मधील मानविवस्तीचे अवशेष आढळून आले आहे. हा प्रदेश तसा आधीपासूनच भक्ती मार्गाचा अवलंब करणारा आहे .**

**या** प्रदेशात बौद्ध धर्म तसा आधीपासूनच कमी प्रमाणात राहिलेला आहे. या प्रदेशात बौद्ध धर्माचा पाया सम्राट अशोक यांनी घातला आहे. कांचीपुरम येथे सम्राट अशोक यांनी एक भव्य बौद्ध स्तूप बांधला आहे, त्याचे अवशेष आजही उपलब्ध आहेत. तामिळनाडूमध्ये आजपर्यंत एकही बौद्ध राजा झालेला नाही. मात्र पल्लव व चोल राजांनी बौद्ध धर्मास राजाश्रय दिलेला आहे. पल्लवांची सत्ता जेंव्हा ई. स. २७५ ला स्थापन झाली तेंव्हा त्यांनी कांचीपुरमला राजधानी बनविली होती .

**राजपुत्र महेंद्र यांचे कार्य :** सम्राट अशोक यांचा मुलगा महेंद्र यांनी सिलोन येथे जाण्याच्या आधी तामिळनाडू मधील कांचीपुरममध्ये बौद्ध धर्माचा प्रचार, प्रसार केलेला आहे. महेंद्र यांनी मदुराईजवळ एक बौद्ध स्तूप उभारला आहे. महेंद्र यांच्या कार्याचे वर्णन चिनी प्रवासी ह्यू यान स्यांग, पंडित हिसेले धर्मरत्न महाथेरो, बौद्ध धर्माचे अभ्यासक प्रा. डॉ. शु. हिकोसाके यांनी आपापल्या ग्रंथात केलेला आहे. महेंद्र काही दिवस कांचीपुरम येथे मुक्कामी राहिले व इथूनच पुढे सिलोनला गेले व तिथेच त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार, प्रसार करून संपूर्ण सिलोन देश बुद्धमय बनविला. इ. स. पूर्व ३ रे शतकमध्ये इथे काही प्रमाणात बौद्ध धर्माचे कार्य झाल्यानंतर सुमारे ७०० वर्षांनी ई.स. ४ थे शतक मध्येच बौद्ध धर्माचे काम सुरू झाले. हे काम ई. स. ६५० पर्यंत चालू राहिले, ३०० वर्षात कांचीपुरम, नागपट्टीनम, कावेरी पट्टीनम, उरियुर ही गावे बौद्धांची मुख्य केंद्र झाली. ह्यूयान स्यंग या चिनी प्रवाशाने ई. स. ७ वे शतकमध्ये कांचीपुरमला भेट दिली तेंव्हा त्याला तिथे शेकडो बुद्ध विहारे, दहा हजार बौद्ध भिक्खू असल्याचे, सम्राट अशोक यांनी उभारलेल्या १०० फूट उंचीचा स्तुप तसेच कांचीपुरम मधील सर्व जनता बौद्ध असल्याचे दिसून आले. या संबंधीचे विस्तृत वर्णन त्याने आपल्या प्रवास वर्णनात केलेले आहकांचीपुरमचे वैशिष्ट : कांचीपुरम हे शहर ई. स. पूर्व २ रे , ३ रे शतकमध्ये वसले आहे. (कदाचित सम्राट अशोक यांनी बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ या शहराची निर्मिती केली असावी असा तर्क लावता येतो.) कांची आणि पुरम या दोन तामिळ शब्दांनी मिळून हा एक शब्द झाला असून त्याचा अर्थ फुलांचे शहर असा होतो. कांचीपुरमचे आता प्रामुख्याने दोन भाग आहेत. १) शिव कांचीपुरम २) विष्णू कांचीपुरम तसा इथे जिना कांचीपुरम म्हणून एक भाग आहे व या भागात जैन धर्मियांची मंदिरे अधिक आहेत. शिव कांचीपुरम व विष्णू कांचीपुरम येथे सर्वत्र प्राचीन बुद्ध विहारे, भगवान बुद्ध, तसेच बोधिसत्व यांच्या प्राचीन मुर्त्या आहेत. कांची येथील कामाक्षी मंदिरात भगवान बुद्ध यांची मूर्ती होती. ही मूर्ती या मंदिरातून हटवून चेन्नई येथील वास्तुसंग्रहालायात ठेवण्यात आली आहे. कांचीपुरम येथे भगवान बुद्ध यांच्या सर्वात प्राचीन मुर्त्या ५ व्या शतकातील आहेत. त्यातील एक मूर्ती ८ फूट उंच उभी आहे. मात्र ती चेन्नई येथील वास्तुसंग्रहालयात ठेवण्यात आली आहे. दुसरी एक मूर्ती कामाक्षी मंदिरजवळ असलेल्या सुब्बाराव मुदलियार उच्च माध्यमिक शाळेत ठेवण्यात आली आहे. ही मूर्ती ५ फूट ६ इंच उंचीची बैठी मूर्ती आहे. अम्मान मंदिरात सुद्धा काही बुद्ध मुर्त्या संग्रही ठेवलेल्या आहेत. कामाक्षी मंदिर परिसरात केलेल्या उत्खननात मिळून आलेली एक बुद्धमूर्ती तामिळनाडूचे तत्कालीन डी.जी.पी. वॉल्टर देवारम यांना एवढी आवडली की त्यांनी स्वतः तिथल्या पोलिस ठाण्यात असलेल्या एका जागी ठेवून घेतली. ती मूर्ती आजही तिथे आहे. कांचीपुरम लगत असलेल्या पुल्लुर येथे सुमारे १२५ वर्षाआधी केलेल्या उत्खननात भगवान बुद्ध यांच्या ३ मुर्त्या मिळाल्या. १९९९ मध्ये या गावी एक बुद्ध विहार बांधण्यात आले. त्या बुद्ध विहारात त्या तीनही मुर्त्या ठेवण्यात आल्या आहेत. सर्व संग्रहित मुर्त्या बघितल्या तर यातील काही मुर्त्या १२०० वर्षांनंतरही अतिशय चांगल्या अवस्थेत असल्याच्या दिसतात. बिहार येथील बोधगया लगत केलेल्या उत्खननात अनेक बुद्धमुर्त्या मिळाल्या आहेत. एक शिलालेखसुद्धा त्यात आढळून आला आहे. या शिलालेखावर कांचीपुरम येथील जनतेने दान केलेल्या बुद्धमुर्त्यांची माहिती देण्यात आली आहे. युरोपियन प्रवासी मार्को पोलो याने सन १२९२ ला कांचीपुरम जवळील समुद्र किनाऱ्याला भेट दिली तेंव्हा त्याला तिथे ७ चैत्यगृह/पॅगोडे असल्याचे दिसून आले. त्या संबंधीचे वर्णन त्याने 'मार्को पोलो याचा प्रवास' या ग्रंथात केलेले आहे. १४ व्या शतकात जावा येथून आलेल्या एका प्रवाशाने कांचीपुरम येथील १३ बौद्ध मठांचे वर्णन केले आहे. याच कांचीपुरम येथील ध्यानभद्र हे बौद्ध भिक्खू बौद्ध धर्माच्या प्रचाराकरिता सन १३७० मध्ये दक्षिण कोरिया येथे गेले. त्यांनी तिथे स्वतःचा स्वतंत्र आश्रम सुरू केला. तिथे जेंव्हा उत्खनन झाले तेंव्हा बौद्ध भिक्खू ध्यानभद्र यांचे विषयी माहिती असलेला एक शिलालेख मिळाला आहे. तामिळनाडूतील प्रसिद्ध पुरातत्त्वशास्त्रज्ञ डॉ. टी. ए. गोपीनाथ राव यांनी त्यांच्या 'एलिमेंट्स ऑफ हिंदू आयकॉनोग्राफी' या ग्रंथात कांचीपुरम येथील कामाक्षी मंदिर हे मूलतः बौद्ध धर्मातील वज्रयानी तारादेवीचे मंदिर (बुद्ध विहार) आहे हे सप्रमाण सिद्ध केले आहे. त्यांनी असेही सांगितले आहे की, कामाक्षी मंदिर परिसरात जमिनी खाली अजून दोन बुद्ध.र्ती असून त्याचे उत्खनन होणे बाकी आहे. त्यांच्या संशोधनाने बऱ्याच ठिकाणी उत्खनन करणे सरकारला सोपे झाले.




**कांचीपुरम मधील महनीय व्यक्ती :** कांचीपुरममध्ये बौद्धधर्म, बौद्ध शिल्पकला, बौद्ध स्थापत्यकला यांचा जसा विकास झाला आहे तसाच या शहरात अनेक नामवंत बौद्ध साहित्यिक, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, कलाकार, विविध क्षेत्रातील अत्यंत महनीय व्यक्तीसुद्धा जन्माला आलेले आहेत. आचार्य आर्यदेव यांचा जन्म ई. स. ३ रे शतकमध्ये झाला. बालवयातच बौद्ध भिक्खू होऊन त्यांनी बौद्ध धर्माचा तामिळनाडू तसेच सिलोनमध्ये प्रचार केला. ते नालंदा विद्यापीठात प्रमुख पंडित म्हणून कार्यरत होते. त्यांनी १०० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली असून त्यात कविता, नाटक, प्रवास वर्णन, बौद्ध धर्मातील विविध सुत्त आदींचा सहभाग आहे. त्यांना बौद्ध धर्मातील 'महायान' पंथाचे जनक म्हणून संबोधले जाते. सिलोन मध्ये महेंद्र, संघमित्रा यांच्यानंतर सर्वाधिक कार्य आर्यदेव यांनी केले आहे. बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ केलेल्या अथक कार्यामुळे त्यांना सिलोनमध्ये 'बोधिसत्व' म्हणून ओळखले जाते. पल्लव राजाचा ३ रा मुलगा बोधिधर्म पल्लव याचा जन्म ई. एस. ४४० ला झाला. याने राजवस्त्र फेकून देऊन बौद्ध भिक्खूची वस्त्रे परिधान केली. यांनी बौद्ध धर्माचा प्रचार तर केलाच केला, पण बौद्ध भिक्खू यांना उत्तम आरोग्य लाभावे म्हणून काही व्यायाम, ध्यानपद्धति विकसित केल्या. त्यांनी 'कुंग - फु' ही मास्टर आर्ट निर्माण केली. कूंग फू या मास्टर आर्टचे ते जनक ठरले. ई. स. ५२० मध्ये ते बौद्ध धर्माच्या प्रचारार्थ चीन मध्ये गेले. तिथे त्यांनी ६ बौद्ध ग्रंथ (ज्यात एक नाटक आहे) लिहिली. आचार्य दिगनाग यांचा जन्म ई. स. ४८० मध्ये झाला. त्यांनी नालंदा विद्यापिठात शिक्षण घेतले. त्यांना 'भारतीय न्यायशास्त्राचे जनक' म्हणून ओळखले जाते. ते महान तर्कशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जातात. तर्कशास्त्र, न्यायशास्त्र या विषयांवर त्यांनी खूप पुस्तके लिहिली असून त्याकाळी भारतातील सर्वच विद्यापीठांमध्ये त्यांची काही पुस्तके अभ्यासक्रमास होती. त्यांनी बालवयातच नागदत्त नामक बौद्ध भिक्खू कडून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती व वयाच्या १५-१६ वर्षाचे असतानाच ते बौद्ध भिक्खू झाले. धर्मकिर्ती यांचा जन्म सातव्या शतकात झालेला आहे. बौद्ध भिक्खू दिगनाग यांना ते आपले गुरू मानत. त्यांनी बौद्ध धर्मावर सात ग्रंथ लिहिली आहेत. दिगनाग यांच्या तर्कशास्त्र तत्वांना त्यांनी अधिक विकसित केले. त्यांनी कांचीपुरम येथे बौद्ध धर्मीय शिक्षणाचे केंद्र सुरू केले. त्यांच्या या शिक्षण केंद्राला बौद्ध धर्माच्या प्रगत शिक्षणाचे जागतिक शिक्षण केंद्र म्हणून ओळख मिळाली होती. त्यांनी नालंदा विद्यापिठात शिक्षण घेतले व शिक्षण सुरू असतानाच बौद्ध भिक्खू झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी या शहरात शिक्षणाचे मोठे कार्य व बौद्ध धर्माचा प्रचार केला.



जयसिंग वाघ
मो.9881928881

**आताची दयनीय अवस्था :** तामिळनाडूतील प्राचीन बौद्ध स्थळे खूप कमी असली तरी बहुतांश स्थळे व एकूण कार्य आपणास कांचीपुरम मध्येच दिसतात. एकेकाळी बौद्ध स्थळांची राजधानी म्हणून ओळख असलेल्या या शहरात आता बौद्ध धर्माचे काम मात्र शून्यवत आहे. अनेक प्राचीन मुर्त्या एकतर इतरत्र हलविण्यात आल्या आहेत तर काही मुर्त्या चोरीस गेलेल्या आहेत. काही बौद्ध स्थळांवर अन्य धर्मीय मंदिरे बांधली गेली, एकेकाळी जागतिक कीर्तीचे बौद्ध शिक्षण केंद्र असलेल्या या शहरात आता बौद्ध शिक्षण पूर्णतः बंद आहे. एकेकाळी तिथली सर्वच जनता बौद्ध होती. मात्र आता या शहरात बौद्ध लोक अगदी नाममात्र आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार या शहरात फक्त १६ लोक बौद्ध धर्मीय होते. आज या शहरातून बौद्ध धर्माची ओळख पुसली गेली आहे.●●

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प - १८२

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा सोनेगाव बाई ता देवळी. जि. वर्धा



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा मुख्य चौकात असून येथिल लोक येथे एकत्र येतात. दिनविशेष कार्यक्रम आयोजित करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार येथिल लोक शिक्षण घेऊन संघटित आहेत. येसगाव हे चळवळीचे ठिकाण आहे.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

# हातावरील जखमेच्या डागामुळे उमेदवाराला नोकरीसाठी अपात्र ठरविणे बेकायदेशीर : उच्च न्यायालय



**नागपूर :** केंद्रीय सशस्त्र पोलिस दलातील (CAPF) कॉन्स्टेबल पदासाठी अर्ज केलेल्या नागपूरच्या एका तरुणीला हातावरील हायपरट्रॉफिक स्कार असल्याच्या कारणावरून वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरविण्यात आले होते. मात्र, या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रद्द ठरवत उमेदवाराला दिलासा दिला आहे. हातावरील जखमेच्या डागामुळे उमेदवाराला नोकरीसाठी अपात्र ठरविता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा न्यायालयाने दिला.

अर्चंती यांनी कर्मचारी निवड आयोगाच्या भरती प्रक्रियेत सहभाग घेतला होता. शारीरिक चाचणी, लेखी परीक्षा आणि इतर सर्व टप्पे त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यानंतर झालेल्या वैद्यकीय तपासणीत प्रथमदर्शनी त्यांना अपात्र घोषित करण्यात आले. पुनर्वैद्यकीय तपासणीतही उजव्या हातावरील हायपर ट्रॉफिक स्कारचे कारण देत त्यांची उमेदवारी नाकारण्यात आली. याचिकाकर्त्यांनी न्यायालयात दावा केला की, एम्स नागपूरच्या वैद्यकीय अहवालानुसार हा व्रण संसर्गजन्य नसून उपचारक्षम आहे. तसेच भरती जाहिरातीत अशा प्रकारच्या व्रणाचा अपात्रतेच्या निकषांमध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही.

सुनावणी दरम्यान न्यायालयाने यापूर्वीच्या विविध न्यायालयीन निर्णयांचा संदर्भ देत स्पष्ट केले की, केलॉइड किंवा हायपरट्रॉफिक स्कार हा कार्यक्षमतेवर परिणाम करणारा शारीरिक दोष मानला जात नाही. त्यामुळे केवळ त्या कारणावरून उमेदवाराला अपात्र ठरविणे योग्य नाही.

न्या. वाय.जी. खोब्रागडे आणि न्या. सुशील घोडेस्वर यांच्या खंडपीठाने १३ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या पुनर्वैद्यकीय मंडळाच्या अहवालाला रद्द ठरविले. तसेच याचिकाकर्ती इतर सर्व निकषांमध्ये पात्र असल्यास तिच्या उमेदवारीचा पुनर्विचार करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले. या निर्णयामुळे केंद्रीय सुरक्षा दलांच्या भरती प्रक्रियेत वैद्यकीय अपात्रतेच्या निकषांबाबत महत्त्वाचा न्यायनिवाडा झाला असून, अशाच कारणांमुळे अपात्र ठरलेल्या उमेदवारांना दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या प्रकरणात पीडित तरुणीची बाजू ॲड. राजेंद्र साहू, ॲड. गुरप्रीतसिंग चंडोक आणि ॲड. गौरव साहू यांनी मांडली.

# 'ईवा'च्या नामकरण सोहळ्यात गायकवाड परिवाराकडून पर्यावरण संवर्धनाचा संदेश- कविसंमेलनाने रंगली सांस्कृतिक मैफल



**नागपूर :** मुलीच्या जन्माचे स्वागत समाजासाठी प्रेरणादायी ठरेल अशा पद्धतीने साजरे करत गायकवाड परिवाराने नामकरण सोहळ्यानिमित्त पिंपळाचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कवी प्रा. भीमराव गायकवाड यांच्या नात ईवा हिच्या नामकरणानिमित्त आयोजित कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक मूल्यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना भदंत नागदीपंकर म्हणाले, 'जन्माला येणारे प्रत्येक बाळ हे एक नवे राष्ट्र असते. त्यामुळे प्रत्येक बालकाचे आनंदाने स्वागत झाले पाहिजे. मुली म्हणजे दोन्ही घरांना प्रकाश देणाऱ्या सूर्यकुलातील लुकलुकणाऱ्या ताऱ्यांसारख्या असतात.'

नामकरण दिनाचे औचित्य साधून इंजिनिअर अखिलेश गायकवाड आणि इंजिनिअर सोनल गायकवाड यांनी चंद्रमणीनगर गार्डन, मेन रोड परिसरात पिंपळाचे वृक्षारोपण केले. या उपक्रमातून 'एक बाळ - एक वृक्ष' हा पर्यावरणपूरक संदेश समाजापुढे ठेवण्यात आला.

यानंतर आयोजित कविसंमेलनात हृदय चक्रधर, ज्योत्स्ना बनसोड, शिल्पा मकेश्वर, रमेश गजभिये, रंगराज गोस्वामी, डॉ. माधव जांभुळे आणि प्रा. भीमराव गायकवाड यांनी विविध विषयांवरील काव्यरचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

वृक्षारोपण कार्यक्रमात सुजाता भीमराव गायकवाड, विलास गजभिये, रामजी माटे, डॉ. प्रज्वल आणि राजेंद्र भिवगडे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले.

यावेळी परिवर्तन विचार मंचच्या वतीने 'वृक्षारोपण मोहीम-२०२६' चा आरंभ केला. या उपक्रमासाठी संथागार फाऊंडेशनचे विशेष सहकार्य लाभले.

## महत्वाचे

## सेवादल महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**नागपूर :** सेवादल महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. यू. मेश्राम यांनी योगाचे मानवी जीवनातील महत्त्व, शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगाची आवश्यकता याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनींना विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. योग प्रशिक्षणाचे मार्गदर्शन महाविद्यालयातील विद्यार्थिनी सलोनी सावलाखे, अश्विनी ढेंगे, खुशी भोयर, ऋचा पात्रे व रुचिता अटाग्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रिता धांडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुशील मेश्राम यांनी केले. योग दिन कार्यक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून योगाभ्यासाचे महत्त्व जाणून घेतले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल सर्व सहभागींचे अभिनंदन करण्यात आले.

## भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**नागपूर :** भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय, नंदनवन येथील स्वस्थवृत्त व योग विभागाच्या वतीने बारावा आंतरराष्ट्रीय योगदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज काळे यांच्या मार्गदर्शनाखाली १५ ते २१ जून दरम्यान योग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'योगा फॉर हेल्दी एजिंग' (Yoga for Healthy Ageing) ही संकल्पना लक्षात घेऊन विविध उपक्रम राबविण्यात आले. योग सप्ताहा दरम्यान विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी महाविद्यालयाच्या उद्यानात सामूहिक योगाभ्यासाचे आयोजन करण्यात आले. तसेच योगाचार्य भारत गुप्ता यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. योग सप्ताहाचा समारोप २१ जून रोजी महावीर नगर ग्राउंड, अझमशाह लेआऊट, नंदनवन येथे आयोजित सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमाने झाला. हा कार्यक्रम आरएआरआय (RARI) तसेच नागपूरातील विविध आयुर्वेद महाविद्यालयांच्या सहकार्याने आयोजित केला होता. यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यशस्वीतेसाठी विभागप्रमुख डॉ. माधवी रेहपाडे, डॉ. ममता तलमले, डॉ. ओमप्रकाश गुल्हाने, डॉ. शरयू गजापुरे, डॉ. रुपाली भनारे, डॉ. स्नेहल भामकर तसेच पदव्युत्तर विद्यार्थी शुभम, लक्ष्मी, आस्था, वैष्णवी, सुरभी, तरुणा, तुषार आणि प्रियंका यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

## नागपूर परिमंडलातील ग्राहकांची 5.70 कोटींची मोठी आर्थिक बचत

**नागपूर :** वाढत्या महागाईच्या काळात सामान्य ग्राहकांच्या खिशाला होणारी कात्री लक्षात घेता, महावितरणने राबवलेली 'स्मार्ट टीओडी' (Time of Day) मीटर योजना नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील वीज ग्राहकांसाठी खऱ्या अर्थाने 'लक्ष्मी' ठरत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांना आर्थिक सवलत देण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमातून गेल्या दहा महिन्यांत ग्राहकांनी तब्बल 5 कोटी 70 लाख रुपयांची भरघोस बचत केली आहे.योजनेच्या अंमलबजावणीनंतर ग्राहकांचा मिळणारा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. जुलै 2025 ते एप्रिल 2026 या दहा महिन्यांच्या कालावधीत नागपूर जिल्ह्यातील ग्राहकांनी 5 कोटी 5 लाख 53 हजार रुपयांची बचत केली आहे.

## निधन वार्ता

## अरुण रामकृष्ण सोलंके



**नागपूर :** आशीर्वाद नगर येथील रहिवासी अरुण रामकृष्ण सोलंके यांचे आजारपणामुळे वयाच्या ५९ व्या वर्षी रविवारी दुपारी ३:१५ मिनिटांनी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात बराच मोठा आप्तपरिवार आहे. मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बहुजन हिताय संघाची ४७५ वी साप्ताहिक सभा



**नागपूर :** बहुजन हिताय संघाची ४७५ वी साप्ताहिक सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, लष्करीबाग येथे उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी कविवर्य हरिश कावरे तर प्रमुख अतिथी प्रा. डॉ. पारीशजी भगत उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण, दीपप्रज्वलन, सामूहिक त्रिशरण-पंचशील व बुद्धवंदनेने झाली. स्मृतिशेष सुधीर भगत व भास्कर सोनटक्के यांना श्रद्धांजली अर्पण केली. बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी आनापानसती ध्यानाचा अभ्यास घेत करुणा, मैत्री व मंगलभावनेचा संदेश दिला. हरिशजी कावरे यांनी उपस्थितांकडून २२ प्रतिज्ञा वदवून घेतल्या. बौद्धाचार्य प्रकाश सोनटक्के यांनी १४ ते २० जून या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा मांडला, तर ज्ञानेश्वरजी वाकडे यांनी २१ ते २७ जून दरम्यान वाढदिवस असलेल्या धम्मसेवक-धम्मसेविकांचे अभिष्टचिंतन केले. नवीन सदस्यांचा परिचय व मनोगत झाले. बौद्धाचार्य शांताराम रंगारी यांनी बुद्धवचनातून रागमुक्त जीवनाचा संदेश दिला. डॉ. सविता कांबळे यांनी उपवर्गीकरणाच्या विषयावर विचार मांडत समाजातील ऐक्याची गरज अधोरेखित केली. हेमंत शिगोंडे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महानाट्याची माहिती दिली. सुत्तपठणात देविदास राऊत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. पारीश भगत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान, त्यांचे साहित्य तसेच पॉवर ग्रीड, दामोदर व्हॅली व भाकरा धरण यांसारख्या विकासकामांतील त्यांच्या भूमिकेचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात हरिश कावरे यांनी धम्म, वर्णव्यवस्था, सामाजिक परिवर्तन व आंबेडकरी चळवळीसमोरील आव्हानांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन आशा शिंगोडे यांनी केले. प्रा. नंदा भगत यांनी समापन गाथा व प्रतिज्ञा वाचन केले. राष्ट्रगीत अरुणा पाटील, वर्षा टेंभेकर व मंगला राऊत यांनी सादर केले. आभार प्रदर्शन बौद्धाचार्य शांताराम रंगारी यांनी केले. सभेनंतर हरिश कावरे यांच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली.



# भारतीय बौद्ध महासभेतर्फे जुलैमध्ये १० दिवसीय श्रामणेर शिबिर

## वर्षावासानिमित्त प्रवचनमालिका व विविध उपक्रमांची घोषणा

**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, नागपूर शहराच्या वतीने समता बुद्ध विहार, द्वारकापुरी येथे आयोजित बैठकीत जुलै महिन्यात १० दिवसीय श्रामणेर शिबिर आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ही बैठक भदन्त कुशल धम्मा सुंदरो यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीला केंद्रीय शिक्षक देवानंद वानखेडे, केंद्रीय शिक्षक गणपत पेटकर, केंद्रीय शिक्षक बी.के. हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वर्षावासानिमित्त नागपूर शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये धम्म प्रवचनमालिका सुरू करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीत श्रामणेर व बोधाचार्य शिबिरे, वर-वधू सूचक मंडळ, तसेच समता सैनिक दलाच्या संघटनात्मक बांधणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समता सैनिक दलाचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. याच बैठकीत भारतीय बौद्ध महासभेतर्फे वर-वधू सूचक मंडळाचे उद्घाटन येत्या २९ जून रोजी करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. बैठकीला केंद्रीय संघटक पद्माकर गणवीर यांची विशेष उपस्थिती होती. त्यांनी १ जुलै रोजी दीक्षाभूमी येथे होणाऱ्या आंदोलनाची भूमिका आणि त्यामागील उद्दिष्टे उपस्थितांना समजावून सांगितली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शहराध्यक्ष विजय मेश्राम यांनी प्रास्ताविक केले, तर प्रवीण कांबळे यांनी बैठकीमागील भूमिका स्पष्ट केली. आभार प्रदर्शन गंगाधर कांबळे यांनी केले. या बैठकीस रविंद्र डोंगरे, विनय ढोक, विजय पाटील, हरिदास नारनवरे, संघशील मेश्राम, अरुण भारशंख, धनंजय राजवंश, अंकुश गणवीर, मनोज वाळके, बुधेंद्र डोंगरे, नामदेव निकोसे, नंदलाल मेश्राम, अरुण शेंडे, देवेंद्र लांजेवार, अमरदीप पाझारे, नरेंद्र थुल यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# बहुजनांच्या न्याय-हक्कांसाठी राजकीय ताकद उभी करणे काळाची गरज : ई.झेड. खोब्रागडे

**नागपूर :** दि स्कूल ऑफ नोबल थॉटच्या उन्हाळी सुटीनंतर सुरू झालेल्या पॉलिटिकल स्कूलच्या उद्घाटन सत्रात 'वर्गीकरण, जनगणना आणि बौद्धांचा विकास आराखडा' या विषयावर ज्येष्ठ सनदी अधिकारी (निवृत्त) तथा संविधान फाउंडेशनचे अध्यक्ष ई. झेड. खोब्रागडे यांनी मार्गदर्शन केले. नरेंद्रनगर येथील समाज भवन, चारिका बुद्ध विहार येथे झालेल्या या कार्यक्रमात त्यांनी बहुजन समाजासमोरील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर सविस्तर भाष्य केले. आपल्या व्याख्यानात खोब्रागडे यांनी आंबेडकरी समाजाने केवळ प्रतिक्रियावादी भूमिका न घेता प्रत्यक्ष कृतीवर भर देण्याची गरज व्यक्त केली. चरित्रवान, निःस्वार्थी, त्यागी आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालीच सामाजिक परिवर्तनाची चळवळ यशस्वी होऊ शकते, असे ते म्हणाले. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या प्रवृत्तींमुळे समाजाच्या मूलभूत प्रश्नांचे निराकरण होत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रशासनात बुद्धांच्या सम्यक विचारांचा स्वीकार करून कार्य केल्यास सामाजिक न्याय अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी आपल्या प्रशासकीय कारकिर्दीतील अनुभवांची उदाहरणे दिली.



खोब्रागडे यांनी अनुसूचित जातींसाठीच्या विकास निधीच्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित केले. सामाजिक न्याय विभागाच्या निधीचे अन्यत्र वळविण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी या विषयावर समाजाने संघटितपणे आवाज उठविण्याची आवश्यकता अधोरेखित केली. वर्गीकरणाच्या मुद्द्यावर समाजाची दिशाभूल होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. 'समस्या सोडवायच्या असतील तर राजकीय ताकद उभी करणे अपरिहार्य आहे. समाजाच्या न्याय-हक्कांसाठी सध्याच्या सरकारला सत्तेतून पायउतार करणे आवश्यक आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच जनगणनेत अनुसूचित जाती व बौद्ध धर्मीयांची अचूक नोंद होणे भविष्यातील धोरणे, विकास आराखडे आणि आरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि स्कूल ऑफ नोबल थॉटचे संचालक डॉ. एन.व्ही. ढोके होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी प्रमुख वक्त्यांच्या विचारांना समर्थन देत समाजातील बुद्धिजीवी, साहित्यिक, विचारवंत आणि निवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रभावी राजकीय नेतृत्व उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. बहुजन समाजाच्या न्याय-हक्कांची लढाई देशपातळीवरील सशक्त राजकीय नेतृत्वातूनच प्रभावीपणे लढली जाऊ शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन बापू खोब्रागडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. बी.पी. नारनवरे यांनी केले. यावेळी निवृत्त संयुक्त संचालक (उच्च व तंत्र शिक्षण) शिंगाडे, कॉटन फेडरेशनचे माजी व्यवस्थापकीय संचालक गोसावी, डॉ. वसंत ढोके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्कूलचे पदाधिकारी, फॅकल्टी सदस्य आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्पतरू बुद्ध विहारात उन्हाळी विद्यार्थी शिबिर उत्साहात



## ३५ विद्यार्थ्यांचा सहभाग

**नागपूर :** डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर येथील कल्पतरू बुद्ध विहारात १५ ते २० जून या कालावधीत बोधीवृक्षाच्या छायेखाली शांत व निसर्गरम्य वातावरणात सहा दिवसीय विद्यार्थी शिबिर उत्साहात पार पडले. शिबिरात विविध शाळांमधील ३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दररोज शिबिराची सुरुवात 'हम होंगे कामयाब एक दिन' या सामूहिक गीताने होत होती. त्यानंतर प्रेरणादायी गीत, चित्रकला, पेंटिंग, स्टिक आर्ट, शुद्धलेखन आदी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. प्रेरणादायी गीत स्पर्धेत 'आकाश मोजतो आम्ही, भीमा तुझ्यामुळे' हे गीत उत्कृष्ट सादर करणाऱ्या आराध्या बनसोड यांच्या चमूने प्रथम क्रमांक पटकावला. 'कुंभारा परी तू भीमा समाजाला घडविले' हे गीत सादर करणाऱ्या सुबोधिनी सोमकुवर, आराधना चौधरी आणि स्वरा नगराळे यांच्या चमूला द्वितीय क्रमांक मिळाला. स्टिक आर्ट, चित्रकला व पेंटिंग स्पर्धेत राज विजय जाधव यांनी प्रथम, तर आराधना चौधरी आणि स्वरा नगराळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. शुद्धलेखन स्पर्धेत दिव्यानी धरम इंगळे आणि अनिरुद्ध अनिल थुल हे विजेते ठरले. तसेच अष्टपैलू विद्यार्थी म्हणून विस्मया बागडे, सार्थक ढाकणे आणि कौस्तुभ घोंगडे यांचा गौरव करण्यात आला.

राष्ट्रीय पब्लिक स्कूल, रावसाहेब ठवरे हायस्कूल, न्यू अपोस्टॉलिक स्कूल, माउंट कार्मेल स्कूल, इंजिनिअर इंग्लिश स्कूल, पंडित बच्छराज व्यास विद्यालय, डब्ल्यू. एस.एस.एल. स्कूल, दिनानाथ हायस्कूल आणि सोमलवार हायस्कूल आदी शाळांतील विद्यार्थ्यांनी शिबिरात सहभाग घेतला.

समारोप कार्यक्रमात भदंत प्रियदर्शी महाथेरो यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व सहभागींना प्रोत्साहन पुरस्कार प्रदान करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पारमी मेश्राम, आदर्श बनसोड, संविधान इंगोले, भीमाई इंगोले, प्रणव कांबळे, स्वरा राऊत, राज जाधव, सृष्टी जनबंधू, स्वारली रंगारी, रुबल पाटील, रियांशी रामटेके, रिधीशा इंगोले यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिराचे संयोजन भीमराव म्हैसकर यांनी केले.

# कळमेश्वरला 'शून्य पाणीटंचाई शहर' बनवण्यासाठी युद्धपातळीवर जलाशयांची क्षमता वाढवण्याची मागणी

**नागपूर :** कळमेश्वर शहरातील वाढत्या पाणीटंचाईच्या आणि येत्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याच्या संभाव्य तीव्र टंचाईच्या पार्श्वभूमीवर, जमात-ए-इस्लामी हिंद नागपूरचे माध्यम प्रभारी डॉ. एम. ए. रशीद यांनी प्रशासनाकडे युद्धपातळीवर ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. ते म्हणतात की, ज्या स्रोतांमधून सध्या पाणीपुरवठा होत आहे, ते संकटाचा सामना करत आहेत, त्यामुळे अस्तित्वात असलेले जलाशय वाचवणे आणि त्यांची क्षमता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. या संकटाचा परिणाम कळमेश्वर ग्रामीण रुग्णालयावरही झाला असून, त्याला अत्यंत मर्यादित पाणीपुरवठा होत आहे. अशी व्यवस्था असायला हवी की तिथे पिण्याच्या पाण्याची समस्या कधीच निर्माण होऊ नये. याव्यतिरिक्त, मीडिया सचिवांनी प्रशासनासमोर काही सूचना मांडल्या आहेत.

**१.जलाशयांतील गाळ काढणे :** बहुतेक जलाशयांमध्ये काही वर्षांतच ३०% गाळ साचतो. दर पाच वर्षांनी तळाची माती आणि वाळू काढण्यासाठी ड्रेजिंग मशीनचा वापर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. काढलेली सुपीक माती शेतकऱ्यांना खत म्हणून विनामूल्य उपलब्ध करून दिली पाहिजे. यामुळे जलाशयांची निष्क्रिय क्षमता १५-२५% ने पुनरुज्जीवित होऊ शकते.

**२.नैसर्गिक गाळ व्यवस्थापन :** जलाशयांमध्ये पाणी येण्याच्या मार्गाच्या दोन्ही बाजूंना मोठी झाडे आणि बांबू लावावेत. या व्यतिरिक्त, मान्सूनच्या पहिल्या जोरदार पावसात गाळ बाहेर काढण्यासाठी जलाशयांचे खालचे दरवाजे उघडावेत. यामुळे कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय दरवर्षी २-३% गाळ काढता येतो.



**३. जलाशय विस्तार :** जलाशयांच्या संरचनात्मक आराखड्यात त्यांची उंची ३ ते ५ मीटरने वाढवण्याची तांत्रिक व्यवहार्यता तपासली पाहिजे. तज्ज्ञांच्या मते, केवळ १ मीटरने उंची वाढवल्यास साठवण क्षमता १० टक्क्यांनी वाढते.

**४. बाष्पीभवन प्रतिबंध :** जलाशयांच्या पृष्ठभागावर तरंगते सौर पॅनेल बसवा. यामुळे ३०% पाण्याचे बाष्पीभवन थांबेल आणि सौर ऊर्जा निर्माण होईल.

**५. भूजल पुनर्भरण :** जलाशयांच्या ३ किमी त्रिज्येच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर पुनर्भरण बोअरवेल बांधल्या पाहिजेत. पावसाळ्यात जेव्हा जलाशय ओसंडून वाहतात, तेव्हा हे अतिरिक्त पाणी या बोअरवेलद्वारे जमिनीत उपसले पाहिजे, जेणेकरून उन्हाळ्यात त्याचा पुनर्वापर करता येईल.

**६. पाण्याला प्राधान्य :** या संकटाच्या काळात, सर्व बांधकाम आणि औद्योगिक युनिट्ससाठी ताज्या पाण्याचा वापर तात्काळ थांबवावा. तहसीलमध्ये निर्माण होणाऱ्या ८०% सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा वापर उद्योग, फलोत्पादन आणि बांधकामासाठी करावा, जेणेकरून पिण्यायोग्य पाणी केवळ पिण्याच्या उद्देशासाठीच राखीव राहील.

७.पावसाचे पाणी साठवणे अनिवार्य करणे : कळमेश्वरमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था कायद्याने अनिवार्य केली पाहिजे. याची अंमलबजावणी सर्व सरकारी इमारती, सदनिका आणि कारखान्यांमध्ये केली पाहिजे. तपासणीनंतर मशिदींच्या वजूगृहांजवळही पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था बसवली पाहिजे. यामुळे भूजल पातळीत ३० टक्क्यांपर्यंत सुधारणा होण्याची शक्यता आहे.

**८. टँकर माफियावर नियंत्रण :** प्रशासनाने मनमानी दरात पिण्याचे पाणी विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि पिण्याच्या पाण्याचे किमान व कमाल दर निश्चित करावेत. जेआयएचच्या माध्यम प्रभारींनी कळमेश्वरला 'शून्य पाणीटंचाई शहर' बनवण्यासाठी 'अमृत २.०' आणि 'जल जीवन मिशन' यांसारख्या योजनांखाली राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडे विशेष आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648